# वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा

**१ ला मजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११००१**

ई-मेल : vslnapune@gmail.com    दुरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५००२०

फॅक्स क्रमांक : ०२०-२६१३००५३

**क्रमांकः कृषि/कक्ष-१/२०११-१२/ सप्रअ/मा.सु./ ११७८ /२०१२**    **दि. ४/०९/२०१२**

**प्रति,**

1. **मा.अध्यक्ष**
   जिल्हा पाणलोट विकास युनिट तथा
   जिल्हाधिकारी

२. **प्रकल्प व्यवस्थापक (एपाव्यका)**
   पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र तथा
   जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

**विषय :** **एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (IWMP)**
**सन-२०११-१२ अंतर्गत मंजूर कार्यक्रमाचे सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याबाबत.**

**संदर्भ :** १. या कार्यालयाचे पत्र जा. क्रं. वपाविय‍ं/निधी / IWMP २०११-१२/२९ /१२,दि. २७/०५/२०११.
२. या कार्यालयाचे पत्र जा. क्रं. वपाविय‍ं/GIS/मासु/४७२/११, दि.१३/०७/२०११
३. या कार्यालयाचे पत्र जा. क्रं.वपाविय‍ं /डीपीआर/सादरीकरण/५१३/२०१२ दि. २९.३.२०१२

एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत २०१०-११ मध्ये मंजूरी मिळालेल्या प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना उपरोक्त संदर्भ क्रं. १ वरील पत्रान्वये देण्यात आल्या होत्या. सदर पत्रासोबत दिलेल्या प्रपत्रामध्ये सन २००९-१० व २०१०-११ मधील सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना आलेल्या अडचणी, क्षेत्रिय स्तरावर काम करणाया अधिकारी/कर्मचारी यांनी केलेल्या सूचना तसेच सन २०११-१२ या वर्षातील प्रकल पांमध्ये उपचार करावयाच्या क्षेत्रामध्ये वन जमीनीचा समावेश करण्यात आल्याची बाब विचारात घेऊन प्रस्तुत प्रपत्रामध्ये काही बदल करुन त्यानुसार सुधारीत मार्गदर्शक सूचना खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

सविस्तर प्रकल्प अहवालातील प्रपत्रांमध्ये प्रकल्प अहवालाची तीन भागात विभागणी केली आहे. त्यामध्ये **पहिल्या भागात** प्रकल्प गोषवारा, गाव निहाय माहितीचा सारांश आणि प्रकल्प विषयक माहितीच्या प्रकरणांचा समावेश केलेला आहे. **दुसया भागात** प्रकल्पात समाविष्ट गावातील मृद व जलसंधारण कार्यक्रमाचे सर्व्हे/गट निहाय नियोजन (Net planning) व **तिसया भागात** प्रकल्पातील समाविष्ट गावांमध्येच प्रस्तावित केलेल्या मृद व जलसंधारण कामांच्या गाव निहाय व उपचार निहाय अंदाजपत्रकांचा (Detailed plan and estimates) समावेश केलेला आहे. भाग-२ व भाग-३ तयार झाल्यानंतर त्याआधारे भाग-१ तयार करुन वंसुधरा पाणलोट विकास यंत्रणेच्या कार्यालयास सादर करावा. सदरचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) वेबसाईटवर ठेवण्यासाठी त्याची CD सुध्दा पाठवावी.

सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना त्रृटी राहू नयेत या दृष्टीने पुढील मुद्यांची कटाक्षाने दक्षता घ्यावी.

१. प्रकल्प अहवालाच्या मुखपृष्ठावर प्राथमिक प्रकल्प अहवालाच्या (PPR) मंजुरी क्रमांकानुसार प्रकल्प क्रमांक दर्शवावा. त्यामध्ये जिल्हयाचे नाव , पी पी आर प्रमाणे मंजूर झालेला क्रमांक, मंजूरीचे वर्ष आणि कंसात मेगा पाणलोट क्रमांक नमूद करावा. **उदा.** Jalna-IWMP-15/2011-12 (GV-17)

२. प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी विहीत केलेल्या प्रपत्रातच माहिती भरावी. त्यामध्ये आपल्या स्तरावर परस्पर बदल करु नयेत.

३. प्रपत्रातील माहिती अचूक आणि सुस्पष्ट असावी. प्रपत्रातील आकडेवारी यापूर्वी सादर केलेल्या PPR शी सुसंगत असावी. त्यामध्ये बदल होत असल्यास ज्या बाबीमध्ये बदल होत असेल त्या ठिकाणी त्याची सुस्पष्ट कारणे नमूद करावीत.

४. प्रकल्पाच्या भाग-१ मध्ये समाविष्ट प्रकरणांमधील लिखाणातील माहिती (Write up) संबंधित प्रकरणासाठी विहीत केलेल्या प्रपत्रातील माहितीशी सुसंगत असावी.

५. प्रपत्रांखाली माहितीचा स्त्रोत आणि संदर्भ वर्ष नमूद करावेत.

६. गाव निहाय माहितीची प्रपत्र भरल्यानंतर, प्रकल्पाचा गोषवारा त्याच प्रपत्रात तयार करावा.

७. प्रकल्प अहवालामध्ये सुक्ष्म पाणलोटांना क्रमांक (Micro-watershed Code Number) देताना ते आपण सध्या वापरत असलेले **GSDA** चे Code Number (eg:- GV-4/03/11) न वापरता **AISLUS** या संस्थेने निर्धारीत केलेले आठस्तरीय Alphanumeric Code Number (eg:- 4D1E8a4c) वापरावेत. यामुळे केंद्र शासनाच्या सामाईक मार्गदर्शक सूचना २००८ नुसार (परीच्छेद १३) प्रत्येक सुक्ष्म पाणलोटासाठी स्वतत्र एकमेव ओळख क्रमांक तयार होईल. (महाराष्ट्र सूदूर संवेदन उपयोजन केंद्र (MRSAC) ,नागपूर यांनी विभागस्तरावर स्थापित केलेल्या GIS Workstations साठी दिलेल्या माहिती (Database) मध्ये सदरचे Code numbers उपलब्ध आहेत.)

८. उपरोक्त संदर्भ क्रं.२ वरिल पत्रान्वये या कार्यालयाने दिलेल्या सूचनानुसार नकाशे जोडावेत. प्रकल्प नियोजनासाठी लागणारे विविध प्रकारचे नकाशे हे विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील GIS Cell मधून उपलब्ध करुन घ्यावेत, आणि या नकाशावर देखील सुक्ष्म पाणलोट दर्शविताना **AISLUS** या संस्थेने निर्धारीत केलेले आठस्तरीय Alphanumeric Code Number दर्शवावेत.

९. उपचार नकाशा वगळता प्रकल्प अहवालासोबत जोडावयाचे इतर नकाशे **A-3** साईझच्या कागदावर योग्य ते प्रमाण घेऊन प्रकल्प निहाय तयार करावेत. तथापि उपचार नकाशा हा १:१०००० या प्रमाणात योग्य आकाराच्या (A3,A1,A2,AO) कागदावर गावनिहाय तयार करावा.उपचार नकाशावर झालेले कामे लाल रंगाने, एपाव्यकामधून प्रस्तावित कामे हिरव्या रंगाने , इतर योजनांतून (Convergence) प्रस्तावित कामे निळया रंगाने दर्शवावीत व उपचार कामांचा तपशील नकाशावर दयावा. यासाठी प्रत्येक वि.कृ.स.सं कार्यालयात **AO** पर्यतच्या आकाराची प्रिंट देऊ शकणारा प्लॉटर पुरवण्यात आला आहे. त्याचा वापर करून विविध नकाशांच्या प्रिंट घ्याव्यात.

१०. प्रकल्पांतर्गत प्रस्तावित केलेल्या उपचार/उपक्रमांशिवाय केंद्र व राज्य शासनाच्या इतर योजनातील घटकांचा प्रकल्पातील घटकांबरोबर सहयोग घेण्यात यावा. (Convergence of scheme)

११. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर त्यास ग्रामसभा, जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC) यांची मान्यता घेण्यात यावी. मान्यता मिळालेलेच सविस्तर प्रकल्प अहवाल वि.कृ.स.सं. यांच्या शिफारसीने या कार्यालयास सादर करावेत. प्रकल्प अहवाल तपासणी बाबत या कार्यालयाचे संदर्भ पत्र क्र.३ वरील पत्रानुसार कार्यपध्दतीचा अवलंब करावा.सदरचे डिपीआर हे राज्यस्तरीय वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेच्या (SLNA) मान्यतेपूर्वी राज्यस्तरीय तांत्रिक समितीकडे (SLTC) छाननीकरिता ठेवण्यात येतील.

सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) हा एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातील अत्यंत महत्वाचा घटक असुन, सविस्तर प्रकल्प अहवालाच्या गुणवत्तेवर प्रकल्प अंमलबजावणीच्या पुढील कार्यवाहीचे यश अवलंबून आहे. तसेच सदरचे DPR संकेत स्थळावर प्रदर्शित करावयाचे आहेत. तसेच सविस्तर प्रकल्प अहवालांचे केंद्र शासनाच्या त्रयस्थ

संस्थेकडून मुल्यमापन होणार आहे. सदर बाबी विचारात घेऊन सन २०११-१२ मधील मंजूर प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल हे शास्त्रीयदृष्ट्या योग्य पद्धतीने आणि गुणवत्तापूर्ण होतील याची कृपया दक्षता घ्यावी.

सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी लागणाया निधीचे वितरण स्वतंत्रपणे करण्यात आले आहे. सदर प्रकल्प अहवालमध्ये उपजीविका, उत्पादन पध्दती व सुक्ष्म उद्योजकता या घटकांच्या माहितीचा समावेश नाही. उपजीविका उपक्रम राबविण्यातबाबत केंद्र शासनाकडून प्राप्त मार्गदर्शक सुचनानुसार उपजीविका कृती आराखडा (Livelihood Action Plan) स्वतत्रपणे तयार करायचा असून त्याबाबतच्या सुचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील. सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी वितरीत केलेल्या निधीपैकी २५ टक्के निधी उपजीविका कृती आराखडा तयार करण्यासाठी राखून ठेवावा.

प्रस्तुत मार्गदर्शक सूचनांनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबतची कार्यवाही तात्काळ सुरु करावी, आणि आपल्या जिल्ह्याचे प्रकल्पनिहाय परिपूर्ण असे सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन दिनांक ३१ डिसेंबर २०१२ पूर्वी या कार्यालयास सादर करावेत. प्रस्तुत मार्गदर्शक सुचना आपल्या जिल्ह्यातील प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम करणाया संस्थानाही द्याव्यात.

**सोबत :- वरीलप्रमाणे (सविस्तर प्रकल्प अहवाल प्रपत्रे पृष्ठ क्रं.१ ते १७)**

**स्वाक्षरीत/-**

**आयुक्त (कृषि)**
**तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा**
**महाराष्ट्र राज्य- पुणे-१**

**प्रत :-** १) मा. प्रधान सचिव (जलसंधारण) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई -३२, यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) प्रधान मुख्य वनसंरक्षक, वन विभाग, नागपूर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

३) **प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा महासंचालक, सामाजिक वनिकरण,पुणे**

४) सहाय्यक प्राध्यापक, तथा प्रकल्प अधिकारी, पाणलोट व्यवस्थापन केंद्र, यशदा, पुणे यांना माहितीस्तव तथा प्रशिक्षण वाचन साहित्यात उचित बदल करण्यास्तव आग्रेषित.

**प्रतिलीपी :-** माहिती व योग्य त्या त्वरीत कार्यवाहीसाठी - विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)